दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 10 मार्च 2026 | अंक क्र. 290 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



### विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे आज रामेश्वर येथे

## राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती महावीर कुस्ती स्पर्धा

लातूर | प्रतिनिधी

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार



आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/-, तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्याहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर कुस्ती स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड, महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

## नागापूर पंप हाऊसची साफसफाई; सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांचा पुढाकार

### परळीकरांना मिळणार शुद्ध व सुरळीत पाणी; रेल्वे लाईनच्या कामामुळे होता दोन दिवस पाणीपुरवठा बंद


परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

परळी वैजनाथ शहराच्या पाणी पुरवठ्याचा मुख्य आधार असलेल्या नागापूर येथील पाणी पुरवठा पंप हाऊसची मोठ्या प्रमाणावर साफसफाई व दुरुस्तीची कामे करण्यास सुरुवात करण्यात आली. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली ही कामे परळी नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या पुढाकाराने पूर्ण करण्यात आली. शहरातील नागरिकांना सुरळीत आणि शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

परळी वैजनाथ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वाण धरण परिसरातील नागापूर पंप हाऊस हे जलशुद्धीकरण प्रक्रियेचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथून शुद्ध केलेले पाणी शहरातील विविध भागांत असलेल्या जलकुंभांमध्ये पाठवले जाते. त्यामुळे या पंप हाऊसची स्वच्छता व देखभाल अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मागील काही दिवसांत येथे साचलेली घाण, शैवाल आणि कचरा यामुळे पंपाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन पाणी पुरवठा विभागाने तातडीने साफसफाईची मोहीम हाती घेतली. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि परळीच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामे करण्यात आली. सभापती जयश्रीताई गित्ते यांनी स्वतः पुढाकार घेत नागापूर पंप हाऊस परिसरातील स्वच्छता, टाकी क्लीनिंग आणि यंत्रसामग्रीची कामे करून घेत आहेत. यामध्ये पंप हाऊस परिसरातील साचलेली घाण मऊ ब्रशच्या सहाय्याने साफ करण्यात आली. तसेच इम्पेलर आणि पाईप्समधील गाळ काढून संपूर्ण यंत्रणा स्वच्छ करण्यात आली. या साफसफाईदरम्यान नागापूर पंप हाऊस येथील 150 एचपी क्षमतेच्या पंपाचे बेरिंग व कपल सेट दुरुस्त करण्यात आले. काही तांत्रिक अडचणी दूर करून हा पंप पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आला. त्यामुळे पंपाची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली असून पुढील काळात पाणीपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे लाईनच्या कामामुळे शहरातील पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईप लाईन दुसऱ्या ठिकाणाहून टाकण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी ९ ते १० मार्च दरम्यान शहराचा पाणीपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला होता. मात्र या दोन दिवसांच्या कालावधीचा योग्य उपयोग करून पाणी पुरवठा विभागाने नागापूर पंप हाऊसची स्वच्छता व किरकोळ दुरुस्तीची कामे सुरू करण्यात आली आहेत. पंप हाऊसची स्वच्छता केल्याने पंपाचे आयुष्य वाढते, कार्यक्षमता टिकून राहते आणि पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होते. याशिवाय निर्जंतुकीकरण प्रक्रियेने पाणी अधिक स्वच्छ आणि सुरक्षित राहते. या सर्व कामांमुळे परळी शहरातील नागरिकांना पुढील काळात शुद्ध व अखंड पाणीपुरवठा मिळणार आहे.

शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती कामे सातत्याने करण्यात येत असून, या कामकाजाबद्दल परळीकर समाधान व्यक्त करत आहेत. परळी शहरातील नागरिकांना स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नागापूर येथील पंप हाऊस हे शहराच्या पाणीपुरवठ्याचे महत्त्वाचे केंद्र असल्यामुळे त्याची स्वच्छता व दुरुस्ती करणे आवश्यक होते. पाणीपुरवठा दोन दिवस बंद





असताना त्या वेळेचा उपयोग करून पंप हाऊसची साफसफाई, टाकी क्लीनिंग तसेच पंपाच्या काही तांत्रिक दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली. यामुळे पुढील काळात परळीकरांना अधिक शुद्ध आणि सुरळीत पाणीपुरवठा करता येईल, असा आम्हाला विश्वास आहे. पुढेही शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे प्राधान्याने करण्यात येतील अशी माहिती परळी वैजनाथ नगर परिषदेचे पाणी पुरवठा सभापती जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी दिली आहे.



# मानवतातीर्था वरील मल्लविद्या: शांती आणि शक्तीचा अपूर्व संगम

## 'विश्वधर्माचा' विचार ; 'शांतीचा संदेश'; 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' ; सर्वजण या, सारे सारे या, अवघे या!






मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी मानवतातीर्थ भवन, रामेश्वर रुई येथे आयोजित राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा 2026 या निमित्ताने एक विशेष लेख सादर आहे.

रामेश्वर रुई येथील पवित्र यज्ञ भूमीवर, विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी एक अभूतपूर्व सोहळा रंगणार आहे. हा केवळ कुस्त्यांचा आखाडा नाही, तर सरस्वतीरत्न विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सरांच्या उदात्त प्रेरणेतून साकारलेला 'विश्वशांतीचा आविष्कार' आहे.

संस्कारांची पावन भूमी: मानवतातीर्थ भवन जिथे विज्ञानाची दृष्टी आणि अध्यात्माची सृष्टी एकत्र येते, त्या मानवतातीर्थ भवनाच्या भिंतींमधूनही आज राष्ट्रप्रेमाचे पडसाद उमटत आहेत. डॉ. विश्वनाथ कराड सरांनी मांडलेला 'विश्वधर्माचा' विचार हा केवळ ग्रंथात मर्यादित न राहता, तो आता मातीतील कुस्तीच्या माध्यमातून जनमानसात झिरपत आहे. हे भवन म्हणजे केवळ दगड-धोंड्यांची वास्तू नसून, ती मानवी मूल्यांचे संवर्धन करणारी एक जिवंत प्रयोगशाळा आहे.

युद्धाच्या सावटात शांतीचा हुंकार आज जग जेव्हा बारुदाच्या ढिगाऱ्यावर बसले आहे, जिथे विनाशाची भाषा बोलली जात आहे, अशा काळात रामेश्वर रुईच्या मातीतून 'शांतीचा संदेश' दिला जात आहे. शस्त्राने मिळवलेला विजय हा तात्पुरता असतो, पण शास्त्र आणि कौशल्याने जिंकलेले मन अजरामर असते. या स्पर्धेचे मूळ सूत्र हेच आहे की, संघर्ष हा विनाशासाठी नसावा, तर तो स्वतःच्या मर्यादा ओलांडण्यासाठी असावा. रणांगणावरील रक्तापेक्षा, आखाड्यातील घाम हा अधिक पवित्र असतो, कारण तो शरीर आणि मनाला सुदृढ करतो.

आखाड्यातील थरार या कुस्ती स्पर्धेचे वर्णन करताना शब्दांनाही नवे धुमारे फुटतात. जेव्हा दोन मल्ल समोरासमोर ठाकतात, तेव्हा ते केवळ दोन देह नसतात, तर ते दोन 'निश्चयाचे महामेरू' असतात. आखाड्यातील ती लाल माती म्हणजे जणू क्रांतीचे प्रतीकच वाटत आहे. मल्लांच्या अंगावर उडणारी माती पाहून असे भासते की, जणू धरणीमाताच आपल्या पुत्रांना आशीर्वादाचा टिळा लावत आहे. मानवता तीर्थभवनातील हे कुस्तीचे मैदान म्हणजे 'जीवनाचे रणांगण' आहे. इथे पडणे म्हणजे हार नाही, तर पुन्हा जोमाने उठण्याची तयारी आहे. आज या 'मल्लांतील जोश, मातीची ओढ आणि मनगटातील मर्दुमकी' या त्रिवेणी संगमाने प्रयागविश्व रामेश्वरचा आसमंत दुमदुमून गेला आहे.

डॉ. कराड सरांचा सुदृढ शरीरात सुदृढ मन हा नेहमीच आग्रह असतो. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' – म्हणजे शरीर हेच सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे पहिले साधन आहे याचा ते कायम दाखला देतात.

आखाड्यात उतरणारा मल्ल हा केवळ बलवान असून चालत नाही, तर तो चारित्र्यसंपन्न आणि संयमी असावा लागतो. या स्पर्धेच्या माध्यमातून तरुणाईला व्यसनांच्या गर्तेतून बाहेर काढून व्यायामाच्या 'नंदवनात' आणण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

विश्वधर्मी सरस्वती रत्न प्रा. डॉ. विश्वनाथ कराड: एक द्रष्टा नेतृत्व ज्याप्रमाणे एखाद्या शिल्पकाराने दगडाला आकार देऊन त्याचे मूर्तीत रूपांतर करावे, त्याप्रमाणे विश्वधर्मी डॉ. कराड सरांनी भारतीय संस्कृतीला आधुनिक विज्ञानाची जोड देऊन हे भव्य आयोजन केले आहे. त्यांच्या प्रेरणेतून साकारलेली ही स्पर्धा म्हणजे 'मानवतेची गुढी' आहे. त्यांच्या मते, कुस्तीतील डावपेच हे कोणाला हरवण्यासाठी नसून, स्वतःमधील सुप्त गुणांना जागृत करण्यासाठी असावेत. मंगळवार दि. १० मार्च रोजी जेव्हा ढोल-ताशांच्या गजरात या स्पर्धांना सुरुवात होईल, तेव्हा रामेश्वर रुईचे आकाश 'हर हर महादेव' आणि 'भारत माता की जय' या घोषणांनी भरून जाईल. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले 'रुस्तम-ए-हिंद' आणि 'महाराष्ट्र केसरी'चे स्वप्न पाहणारे तरुण मल्ल.

अंगात सळसळणारे रक्त, डोळ्यांत जिंकण्याची ईर्षा आणि मनात शांतीचा संकल्प: विश्वशांतीचा एक नवा सूर्योदय रामेश्वर रुई येथील या कुस्ती स्पर्धा केवळ १० मार्चच्या दिवसापुरत्या मर्यादित नाहीत. हा एक विचार आहे जो प्रत्येक तरुणाच्या मनात रुजवायचा आहे. युद्धाच्या धामधुमीत शांतीचा मार्ग हा खेळाच्या मैदानातून जातो, हेच या स्पर्धेने सिद्ध केले आहे. जेव्हा हे मल्ल त्या लाल मातीत एकमेकांना आलिंगन देतील, तेव्हा तो केवळ कुस्तीचा एक प्रकार नसेल, तर ती 'जागतिक बंधुत्वाची' एक मिठी असेल. डॉ. विश्वनाथ कराड सरांच्या स्वप्नातील बलशाली आणि शांतताप्रिय भारत घडवण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

सर्वजण या, सारे सारे या, अवघे या! अनुभूती घ्या! विश्वगुरू भारतासाठी विश्वशांती द्वारे विकसित भारत हे ध्येय साध्य करण्यासाठी विश्वधर्मी सरस्वतीरत्न प्रा. डॉ. विश्वनाथ कराड सर यांनी स्व कष्टातून निर्माण केलेल्या या विश्वशांती राजमार्गावरती चालू या आणि वसुधैव कुटुम्बकम या उदात्त प्रेरणेचे दर्शन देणाऱ्या भारतीय विचारांचे आणि दर्शनांचे पाईक बनून या मार्गावरती पुढे मार्गक्रमणा करूया!

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे ।।
महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।।

– **डॉ. रत्नदीप जोशी,**
कुलसचिव, माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स पुणे भारत

# ह.भ.प.न्यायाचार्य महंत सद्गुरू डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांचे आनंदाचे सिद्धांत ज्ञान अमृताची खाण

ज्ञान हे सृष्टी वरील सर्व दुःखाचं वेदनाशामक औषधं आहे ज्ञानाने सृष्टी वरील सगळ दुःख संपुष्टात येत नष्ट होत.अर्जुनाला विवंचनेतून दुःखातून बाहेर काढण्यासाठी भगवान श्रीकृष्ण यांनी गीता निर्माण केली कलियुगात ज्ञानेश्वर माऊली यांनी गीतेची ज्ञानेश्वरी करत सर्व सामान्य माणसाला ज्ञान अमृत दिलं आणि आता या तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानेश्वरी मधील प्रत्येक ओवी सर्व सामान्य माणसाला समजण्यासाठी देशातील एकमेव न्यायाचार्य भागवत धर्माचे प्रचारक प्रसारक ज्ञानाचे महासागर गुरू श्रीगुरू सद्गुरू श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी आध्यत्मिक क्षेत्रात क्रांती घडवत आनंदाचे सिद्धांत हि संकल्पना आणली आणि संबंध युटुब वर जगभरातील लाखो लोक या आनंदाच्या सिद्धांताचा लाभ घेत आहेत हि तंत्रज्ञान युगातील ज्ञानाची क्रांतीच आहे.डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांचे ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीवरील भाष्य हे तन मन बुद्धी तृप्त करणार विवेचन असून विश्व कल्याणासाठी ऐतिहासिक पाऊल आहे.आनंदाचे सिद्धांत ज्ञान अमृताची खाण आहे कितीही दुःखी व्यक्तिने हे सिद्धांत ऐकले तर त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे भरते येणारच म्हणून हे आनंदाचे सिद्धांत आहेत डिजिटल साधानाचा वापर प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे त्यामुळे ज्ञानेश्वरी देखील डिजिटल करण्याचा जगातील पहिला प्रयोग भागवत धर्माचं ज्ञान पीठ श्री क्षेत्र भगवानगडाच अभूतपूर्व अस योगदान आहे आणि तंत्रज्ञान युगात जागतिक पातळीवर ज्ञानेश्वरी पोहचवून वैश्विक पातळीवर ज्ञानाचा वर्षाव करत श्री क्षेत्र भगवानगड ज्ञान पीठ हि ओळख सार्थ ठरवली आहे.अर्जुनाला जेव्हा रणभूमीवर जीवनाविषयी आणि संसारातील सृष्टी वरील वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने प्रश्न निर्माण झाले आणि त्याने दुःखी होऊन युद्ध न करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याच्या प्रत्येक प्रश्नच सटिक उत्तर भगवान श्रीकृष्ण यांनी दिले आणि अर्जुनाच्या शंका निरासन करून त्यांचं अंतःकरण तृप्त केले आणि त्याच्यावर ज्ञान वर्षाव केला ते सर्व क्षेत्राशी निगडित ज्ञान म्हणजे गीता होती ज्या मध्ये जन्म ते मृत्यू जीव सृष्टीचा आरंभ ते अंत यांसह प्रत्येक बाबीचा समावेश होता. आजच्या काळात सर्व सामान्य माणसाला अनेक प्रश्न आहेत समस्या अडचणी आहेत दुःख आहेत वेदना आहेत शंका आहेत या शंकांचं समाधान व्हावं आणि त्या माध्यमातून गीता ज्ञान अर्क देखील वैश्विक पातळीवर विश्वाच्या कल्याणासाठी सर्वदूर पोहोचला पाहिजे म्हणून आनंदाचे सिद्धांत या माध्यमातून युटुब चॅनल वर ज्ञानेश्वरीच चिंतन अगदी सहज सुलभ करत ज्ञान वर्षाव करण्याचं महान कार्य या देशातील एकमेव न्याचार्या गुरू श्रीगुरू सद्गुरू ज्ञानाचे महासागर भागवत धर्माचे ज्ञान पीठ श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ नामदेवशास्त्रीजी यांनी सहजपणे केले आहे त्याचा लाभ लहान थोरा पासून थोर मोठ्या पर्यंत सगळ्यांना होत आहे.सध्या तंत्रज्ञानाचा लाभ कमी आणि तोटाच जास्त होतं आहे तरी देखील तंत्रज्ञानाचा योग्य विनियोग व्हावा यासाठी आध्यत्मिक क्षेत्रात नव क्रांती घडवली आहे. तंत्रज्ञान युगात वाचन संस्कृती जवळपास संपुष्टात आली आहे लोकांना काम काहिच नाही मात्र वेळ कोणाकडे देखील उपलब्ध नाही आणि लोक आधिक गतीमान व चंचल झाले आहेत या विचित्र काळात देखील सर्व सामान्य लोक ज्ञाना पासून वंचित राहू नयेत म्हणून ज्ञानाचे महासागर गुरू श्रीगुरू सद्गुरू देशातील एकमेव न्यायाचार्य डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी आनंदाचे सिद्धांत स्वरूपात ज्ञानेश्वरी वैश्विक पातळीवर अगदी सुलभ आणि सोपी करत पोहोचवली आहे ज्यांचं लाभ वैश्विक पातळीवर सगळ्यांना होत आहे.ज्ञानेश्वरी हे भगवद्गीतेवरील अमर भाष्य आहे जे आनंदाचे गहन सिद्धांत शिकवते.तंत्रज्ञानाच्या या वेगवान युगातही ती ज्ञानाची अमृतखाण ठरली आहे जी वैश्विक पातळीवर मानवी मनाला शांती आणि आनंदाची अनुभूती प्राप्त करून देते दारिद्र्य अथवा गरिबी हि फक्त अर्थिक नसते तर वैचारिक मानसिक आणि सामाजिक देखील असते या तिन्ही स्तरांवर असणारी गरिबी अथवा दारिद्र्य संपुष्टात येण्यासाठी आनंदाचे सिद्धांत हे संजीवनी बुटी ठरले आहेत म्हणून ज्ञान अमृत सिंचन हाच संतांचा जीवन उदेश असतो आणि तो श्री क्षेत्र भगवानगड येथून अविरत चालू आहे हे महाराष्ट्र राज्यांच भूषण आहे.ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जगद पालक भगवान श्रीकृष्ण यांनी सृष्टीच्या कल्याणासाठी प्रकट केलेल ज्ञान संतश्रेष्ठ जगद्गुरु ज्ञानेश्वर माऊली यांनी अगदी सहज सूलभ केल आणि हेच ज्ञान अमृत डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी आनंदाचे सिद्धांत या संकल्पनेचा विस्तार करत ज्ञानेश्वरीतील आनंद सर्वदूर वैश्विक पातळीवर पोहचवला ज्ञानेश्वरी हे केवळ क्षणिक सुख नसून तो शाश्वत आनंद तर आहेच त्या पुढे जाऊन तो आत्मसाक्षात्कारातून मिळणारा परमानंद देखील आहे याची प्रचिती आणि अनुभूती आनंदाचे सिद्धांतातून प्रकट होत आहे.भक्ती हा मायारूपी नदी पार करणारा एकमेव मार्ग असून त्यातून दुःखाची निवृत्ती होऊन आनंदाची प्राप्ती होते अष्ट सात्त्विक भावांद्वारे ते आनंदाच्या मनोज्ञ अवस्था चित्रित करतात ज्यात शांती आणि आनंद



एकत्व पावतात प्रत्येक ओवीच सप्रमाण विवेचन यथार्थ वर्णन आणि वास्तव चित्रण प्रभावी मांडणी ज्यामुळे सर्व सामान्य माणसाला ज्ञान बोध होऊन अंतःकरण शुद्ध करून दुःख मुक्तीचं दर्शन घडते आहे.या सिद्धांतांचा आधार समत्वयोग आहे ज्यात सुख-दुःख समान पाहावे हा मुलभूत उपदेश आहे.निःस्वार्थ कर्म भक्ती आणि ज्ञान हे त्रिकोण आनंदाकडे घेऊन जाणारा पथ मार्ग आहे. ज्ञानेश्वर माऊली यांचे अद्वैत हे जगाला मिथ्या न मानता सद्वस्तूची प्रभा म्हणून पाहते ज्यामुळे जीवन आनंदमय होतं.ज्ञानेश्वरीचे मर्म हेच आहे की ज्ञानेश्वरी ही ज्ञानाची अमृतखाण आहे मात्र सर्व सामान्य माणसाला हे वास्तव समजविण्यासाठी आनंदाचे सिद्धांत एक प्रभावी माध्यम म्हणून सिद्ध झालं आहे.कर्मयोग ज्ञानयोग भक्तियोग आणि संन्यासयोग यांचे दर्शन ज्ञानेश्वरी मध्ये घडते ज्ञानेश्वर माऊली यांनी तर्काच्या फोलपणावर भक्ती आणि आत्मानुभवाला प्राधान्य दिले आहे हे वास्तव सत्य डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी अगदी सहजपणे श्रोत्यांना समजावले आहे म्हणून सावध अवस्थेत ध्यानस्थ होयच असेल तर आनंदाचे सिद्धांत ऐकून आत्म्याचे अमृत अर्जित केलेच पाहिजे.ईश्वर हे विश्वाचे आदिकारण असून त्याची साक्ष आत्म्यात मिळते. हे ज्ञान अमृतासारखे अमर असते सद्गुरू च्या कृपेने ते प्रवाहित होते तोच ज्ञान प्रवाह जो कुरू क्षेत्रात प्रकट झाला तो अलंकापुरी मार्गे व्हाया श्री क्षेत्र भगवानगडावर पोहचला आणि तंत्रज्ञान युगात माहितीचा अतिरेक असूनही मानसिक तणाव एकटेपणा वाढला आहे हे वास्तव आहे या सर्व समस्यांवर एकमेव पर्याय ज्ञानेश्वरीचे आनंद सिद्धांत हे डिजिटल क्षेत्रात प्रगती आणि मनाला आनंदी करून दुःख मुक्ती देणारे औषध आहे. समत्वयोगाने सोशल मीडियाच्या सुख-दुःखाच्या लाटांवर नियंत्रण मिळते तर निःस्वार्थ सेवेमुळे व्हर्च्युअल जगातही खरा आनंद शोधता येतो ज्ञानेश्वर माऊली यांच जग ही चैतन्याचा विलास हे तत्त्व क्रांतिकारी आहे. तंत्रज्ञान हे साधन असू नये तर आत्मानंदाकडे घेऊन जाणारा मार्ग असावा भक्तीचा मार्ग मायेच्या नदीत पाणीच उरायला सोडत नाही.वैश्विक पातळीवर ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वरीचा प्रभाव आता जागतिक पातळीवर निर्माण झाला आहे.डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी प्रत्येक ओवी व्यवस्थित रित्या यूट्यूब सोशल मीडियावर प्रवचनांद्वारे आनंदाचे सिद्धांत या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत पोहोचवली आहे. पाश्चात्य विचारवंतांसाठी तिचे अद्वैत आणि माइंडफुलनेसशी साम्य आहे.युरोप-अमेरिकेत वारकरी संप्रदायाचे अध्ययन होत असून, ज्ञानेश्वरीचे तत्त्वज्ञान योग, मेडिटेशनशी जोडले जाऊ लागले आहे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ती 'ग्लोबल गीता कमेंटरी' म्हणून उदयास आली आहे.आनंदाचे सिद्धांत हे युनिवर्सल सर्व धर्मांपलीकडे जाऊन विश्वात्म्याला जोडतात.आनंद सिद्धांतांची आधुनिक अंमलबजावणी ज्ञानेश्वरीला कालातीत बनवते. तंत्रज्ञान युगात आव्हान म्हणजे सततची विचलितता परंतु ज्ञानेश्वरीची संधी म्हणजे तीच तंत्रे वापरून म्हणजे युटुब शोशल मिडिया द्वारे आनंदाचा प्रचार आणि प्रसार.तरुण युवा वर्गाला 'आनंदाचे सिद्धांत सारख्या प्रवचनांमुळे सुलभ रित्या ज्ञान सागर उपलब्ध झाला आहे वैश्विक महामारीनंतर मानसिक आरोग्यासाठी आनंदाचे सिद्धांत हि काळाची गरज होती हिच गरज ओळखून श्री क्षेत्र भगवानगड येथून विश्वाच्या दिशेने ज्ञानाचा प्रकाश गतीमान झाला. ज्ञानेश्वरीचा शाश्वत वारसा म्हणजे ज्ञानेश्वरी हा केवळ ग्रंथ नसून आनंदाची जीवनपद्धती आहे याचा प्रत्यय आनंदाचे सिद्धांत देतात आणि तंत्रज्ञानाच्या वेगाला मागे टाकून वैश्विक शांततेचा पाया घालतात. प्रत्येकाला हे सिद्धांत ऐकून परमानंद प्राप्त करता येऊ शकतो.

– **गणेश खाडे**
विचारवंत साहित्यिक लेखक आध्यत्मिक मार्गदर्शक तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र (9011634301)

# टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ . सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्ती ; ग्रामस्थांकडून सत्कार

**आष्टी (प्रतिनिधी)**



आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांची कन्या डॉ. सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या या यशाबद्दल टाकळसिंग येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. सायली जगताप यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथीपर्यंत वस्ती शाळेत झाले. त्यानंतर पाचवी ते आठवीपर्यंत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग येथे शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी कन्या प्रशाला, आष्टी येथे दहावीपर्यंत शिक्षण घेतले. अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी लातूर येथील राजश्री शाहू कॉलेजमध्ये पूर्ण केले.

महाराष्ट्राचे माजी मंत्री व मराठवाडा भूषण, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची वाट निवडली. त्यानंतर डहाणू येथील एमबीबीएस महाविद्यालयात प्रवेश मिळवून त्यांनी एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. सध्या त्या पुढील पीजी शिक्षणासाठीही तयारी करत आहेत.

आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनानुसार बीड जिल्ह्यातील रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी पदांसाठी अर्ज केल्यानंतर त्यांची टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. या यशाचे संपूर्ण श्रेय बद्रीनाथ जगताप यांनी आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाला दिले असून आमच्या कुटुंबाची प्रगती आ.धस यांच्या मार्गदर्शनामुळेच झाली आहे. ते आमच्या कुटुंबासाठी दैवतासारखे आहेत अशी भावना यावेळी बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.

### आमदार सुरेश धस यांचे मोलाचे मार्गदर्शन; आमच्यासाठी दैवताप्रमाणे – बद्रीनाथ जगताप

**"आमदार सुरेश धस यांचे आम्हाला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. माझी मुलगी डॉ. सायली जगताप हिने डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले त्या दिवसापासून ते ते स्वप्न साकार होईपर्यंत आमदार सुरेश धस यांनी आम्हाला सतत प्रेरणा, मार्गदर्शन आणि आधार दिला. केवळ राजकीय नेतृत्व नव्हे तर कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याप्रमाणे त्यांनी आमच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून वेळोवेळी सहकार्य केले. आज माझ्या मुलीने वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारणे हे आमच्यासाठी अभिमानाचे क्षण आहेत. या यशामागे आमदार सुरेश धस यांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद मोठ्या प्रमाणात लाभले आहेत. आमच्या कुटुंबाच्या प्रत्येक यशामागे त्यांचे मोलाचे योगदान असून ते आमच्यासाठी दैवताप्रमाणे आहेत," अशी भावना आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जागतिक महिला दिनानिमित्त खोलेश्वर महाविद्यालयात महिलांचा सन्मान

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संस्कार देणारा कारखाना – नगराध्यक्षा सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था केवळ शिक्षण क्षेत्रात काम करते असे नव्हे तर सामाजिक दायित्वाचं कंगण हातात ठेवून विचार परंपरेने चालणारे कुलक्षेत्र आहे. माझ्या संपुर्ण आयुष्यात संस्थेचा आदर्श आणि शिकवण नेहमीच कामी आली. महिला दिनाचे औचित्य साधून घरकाम करणार्या कष्टकरी महिलांना संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयात भेट वस्तू देवून सन्मान करण्याची परंपरा खर्या अर्थाने समाजाला आदर्श देणारी म्हणावी लागेल असे प्रतिपादन परळी शहराच्या नगराध्यक्ष सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील खोलेश्वर महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती अनेक वर्षांपासून महिला दिनाचे औचित्य साधून रविवार, दिनांक ८ मार्च २०२६ रोजी शहरातील श्रमिक, कष्टकरी महिलांचा सन्मान केल्या जातो. यंदा घरकाम करणार्या कष्टकरी २७५ महिलांना भेट वस्तू देवून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात झालेल्या




कार्यक्रम व्यासपीठावर नगरसेविका सौ.सुचितताई देशपांडे, सौ.वर्षाताई मुंडे, सौ.पुजाताई कुलकर्णी, सौ.संगितताई धर्माराव, सौ.अंकुश मॅडम आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.दिपक फुलारी यांनी मागच्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयात महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणार्या कष्टकरी महिलांचा सन्मान करण्याचे भाग्य आम्हांला लाभते. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली यंदा २७५ महिलांनी उपक्रमात सहभाग घेतला. पुढच्या वर्षी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेणार असल्याचेही ते म्हणाले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रात काम करताना सामाजिक बांधिलकी हे व्रत संस्थेचा मुळ आधार आहे. हिंदू संस्कृती रूढी, परंपरा विविध उपक्रम त्यासाठी संस्थेच्या विचारधारेखाली शिवाय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे असे उपक्रम आम्ही हाती घेतो. आपल्या भाषणात पुढे बोलताना नगराध्यक्षा सौ.धर्माधिकारी यांनी संस्थेत बोलावल्याचा आनंद व्यक्त करताना स्पष्ट सांगितले की,संस्थेसोबत माझे नाते अंतरंग जन्मोजन्मीचे असून खर्या अर्थाने संस्था म्हणजे संस्कार देणारा आणि राष्ट्रभक्त घडविणारा कारखाना होय. माझे संपुर्ण शिक्षण संस्थेच्या सिद्धेश्वर संस्कार केंद्रात झाले. त्यामुळे सामाजिक दायित्व याची ओळख झाली. त्याचा फायदा मला परळीसारख्या शहराची सेवा करण्यासाठी होतो. महिला दिनानिमित्त खोलेश्वर महाविद्यालयाने स्तुत्य उपक्रम घेवुन शिक्षण संस्थेत नविन आदर्श दाखवून दिला. खर्या अर्थाने कष्टकरी, श्रमिक महिलांना सन्मान मिळवून देण्याची गरज असते. ज्यांच्या जीवावरच आपण लोक विश्वासाने संसार करीत असतो. स्त्री म्हणजे देवाचं वास्तव्य ज्यांच्या अंगी असतं. संकटे कितीही आली तरीही सामना करण्याचं सामर्थ्य आमच्या अंगी आहे. कारण त्याग, संयम, सेवा, समर्पण या सार्या चौकटीत राहुन आम्ही काम करत असतो. यशस्वी पुरूषांमागे स्त्री असं म्हणतात. पण, माझ्या राजकिय स्त्री जीवनात पुरूष खंबीरपणे पाठीमागे असल्याचे उदाहरण त्यांनी पतीच्या रूपात इथे दिले. कार्यक्रम समारोप प्रसंगी बोलताना डॉ.हेमंत वैद्य यांनी सांगितले की, संघ विचार संस्था पुढे घेवून जाताना सामाजिक दायित्व हेच संस्कार सनातन धर्मातून आमच्यावर झाले. जिथे महिलांचा सन्मान होतो, तो देश आणि राज्य ईश्वर स्वरूप नारी म्हणून ओळखल्या जाते. समाजात लोकांच्यासाठी काम करावं पण, त्याचा गाजावाजा किंवा दिखावा आम्ही करीत नसल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सौ.वेडे यांनी केले. याप्रसंगी नगराध्यक्षा तथा मान्यवरांच्या शुभ हस्ते महिलांना भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले. उपस्थितांचे आभार प्रा.सौ.अंजली देशमुख यांनी मानले.

# सिरसाळा पोलीस ठाण्याचे एपीआयच्या वक्तव्याचा राज्यभरातून निषेध

## वक्तव्याबाबत परळी वकील संघाने ठराव घेऊन निषेध व्यक्त केला

**परळी | प्रतिनिधी**

**परळी वकील संघाने ठराव घेऊन निषेध व्यक्त केला व दहिफळे याची जिल्ह्याबाहेर तडफातडफी बदली करावी अन्यथा आंदोलन करण्याची वकील संघाची भुमिका**

**परळी वकील संघाने दिनांक 11 फेब्रुवारी 2026 रोजी बैठक घेऊन दहिफळे याची जिल्ह्याबाहेर बदली करा म्हणून पोलीस महासंचालक मुंबई व जिल्हा पोलिस अधीक्षक बीड यांच्याकडे मागणी केली होती मागणी**

सिरसाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दहिफळे हे नागरिकांशी बोलताना केलेल्या वक्तव्यामुळे वकील वर्गात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. संबंधित अधिकारी दहिफळे हे आरोपांना विशिष्ट वकिलच लावा अन्यथा तुमची जामीन होऊ देणार नाही म्हणून आरोपीवर दबाव टाकतात. तसेच मीच आरोपीची जामीन करतो. वाळुचे ट्रक सोडविण्यासाठी सुद्धा अमुक वकील लावा अन्यथा तुम्हाला माझ्या हद्दीत धंदा करू देणार नाही. वगैरे वकिलांच्या तक्रारीवरून परळी वकील संघाने दिनांक 11 फेब्रुवारी 2026 रोजी बैठक घेऊन दहिफळे याची जिल्ह्याबाहेर बदली करा म्हणून पोलीस महासंचालक मुंबई व जिल्हा पोलिस अधीक्षक बीड यांच्याकडे मागणी केली होती. त्याचा राग मनात धरून संपूर्ण वकिलांबाबत व वकिलांच्या व्यवसायाबद्दल अपमानास्पद भाषेचा वापर करू लागला आहे.एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून त्यामध्ये त्यांनी वकिलांबाबत केलेल्या विधानांवरून वकील बांधवांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या वक्तव्यामुळे वकिलांच्या व्यावसायिक प्रतिष्ठेवर आरोप केला आहे. वकिलांना कायद्याने कोर्टचा अधिकारी संबोधले जाते.कायद्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वकिलांची अशा प्रकारे बदनामी करणे तसेच त्यांच्यावर सार्वजनिकरित्या आरोप करणे योग्य नसल्याची प्रतिक्रिया काही वकील बांधवांनी व्यक्त केली आहे. दरम्यान,




य ा प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत परळी वकील संघाने ठराव घेऊन निषेध व्यक्त केला व दहिफळे याची जिल्ह्याबाहेर तडफातडफी बदली करावी अन्यथा आंदोलन करण्याची भुमिका घेतली आहे. याकडे सर्व जिल्हाभरातील वकिलांचे लक्ष लागले आहे.

या प्रसंगी परळी वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड धनाजी कांबळे, ॲड एच व्ही गुट्टे ॲड आर.व्हि.गित्ते ,ॲड प्रदिप गिराम ॲड आर व्हि देशमुख ॲड जीवनराव देशमुख ॲड मिर्झा मंजुर, ॲड लक्ष्मण अघाव ॲड मिर्झा मंजुर अली, ॲड.माधवराव मुंडे, ॲड वैजनाथ नागरगोजे, ॲड दिलीप स्वामी, ॲड प्रभाकर सातभाई, ॲड प्रकाश मराठे ॲड वसंतराव फड ॲड दस्तगीर ॲड शेख शकीक ॲड डि.एल.उजगरे.ॲड नागापूरकर ॲड बी डी उजगरे ॲड मोहन कराड ॲड गजानन पारेकर ॲड लक्ष्मीकांत मुंडे ॲड कल्याण सटाले ॲड मार्तंड शिंदे ॲड लक्ष्मण गित्ते ॲड जगन्नाथ आंधळे ॲड ज्ञानोबा मुंडे ॲड सुनिल सोनपीर ॲड दिनकर वाघमोडे ॲड राहुल सोळंके ॲड दत्तात्रय कराड ॲड प्रविण फड ॲड अतिष पोतदार ॲड बालाजी कराड ॲड आबा सोळंके ॲड केशव अघाव ॲड अर्जुन सोळंके ॲड उमेश घोडके ॲड शहेबाज पठाण ॲड शहाणे ॲड सुल्तान ॲड बालाजी फड ,ॲड सुनील राठोड,ॲड नंदकुमार राठोड इत्यादींनी भाग घेतला.

# काळमवाडी शाळेच्या यशोगाथेचे सादरीकरण राज्यस्तरावर !

## सौ . पुनम सूर्यवंशी यांनी केले सांगली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व

**शिराळा /प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग ( भा.प्र. से.) यांच्या अध्यक्षतेखाली ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या सहकार्याने महाराष्ट्रातील निवडक सरपंच, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य यांची ऑनलाइन बैठक पार पडली.


शिक्षण सेतू भागधारकांची शिक्षणातील समन्वयी भूमिका या अंतर्गत शाळांच्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी समाजातील विविध भागधारकांनी केलेल्या कामांच्या यशोगाथा यावेळी जाणून घेण्यात आल्या.

या बैठकीसाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेचे सहसंचालक रमाकांत काठमोरे, शरद गोसावी, ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या पल्लवी मुखेडकर, मधुकर माने, ओंकार उगले, प्रशांत भोसले, अजय पाडळे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीसाठी संपूर्ण सांगली जिल्ह्यातून वाळवा तालुक्यातील काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या, शाळा व्यवस्थापन समितीच्या अभ्यासू सदस्या सौ. पूनम अमित सूर्यवंशी यांची एकमेव निवड झाली होती. या बैठकीमध्ये त्यांनी सांगली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना काळमवाडी जिल्हा परिषद शाळेची यशोगाथा सादर केली. पालकांच्या सहयोगातून, शाळा स्तरावर राबवलेले विविध उपक्रम कसे यशस्वी केले आहेत हे त्यांनी अभ्यासपूर्ण आणि विस्तृत मांडले.काळमवाडी जिल्हा परिषद शाळेचे उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे यांच्या संकल्पनेतून गेली दोन वर्षे सातत्याने राबविण्यात येत असलेल्या "फटाकेमुक्त दिवाळी" या उपक्रमाची यशोगाथा त्यांनी सादर केली. माननीय आयुक्तांना हा उपक्रम विशेष आवडला. त्यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले

याचबरोबर शैक्षणिक पालक सभा, प्रत्येक मुलांची पोर्टफोलिओ फाईल, शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठका, लोकसहभागातून निर्माण केलेल्या शाळेच्या भौतिक सुविधा, शैक्षणिक ग्रामसभा, पालकांनी शाळेसाठी वेळ देणे व मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग, शाळेची शैक्षणिक गुणवत्ता या मुद्द्यांना अनुसरून शाळा स्तरावरील विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी याचे उत्कृष्ठ, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी सादरीकरण त्यांनी केले.

### दीपक रोकडे यांच्या फटाकेमुक्त दिवाळी अभियानाचे केले आयुक्तांनी कौतुक !

**काळमवाडी शाळेतील उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे यांच्या संकल्पनेतून गेली दोन वर्षे फटाकेमुक्त दिवाळी अभियान हा उपक्रम राबवला जात आहे. ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळण्याबरोबरच फटाक्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पैशातून विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तके खरेदी करण्यासाठी प्रेरित केले जाते. गतवर्षी या उपक्रमाच्या माध्यमातून ७४५ पुस्तकांचे तर यावर्षी ११६४ पुस्तकांचे संकलन झाले आहे. जास्तीत जास्त पुस्तके संकलित करणाऱ्या प्रत्येक वर्गातील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र आणि शिल्ड देऊन गौरवण्यात येते. विद्यार्थ्यांना वाचनाकडे नेणाऱ्या या उपक्रमाचे राज्याचे आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी कौतुक केले आहे.**




# डॉ. सौम्या शर्मा लोकाभिमुख आयुक्त

अमरावती महानगरपालिकेच्या लोकाभिमुख आयुक्त डॉ. सौम्या शर्मा यांची माझी पहिली भेट नागपूर येथे त्यांच्या नागपूर जिल्हा परिषदेच्या कार्यालयात झाली .त्याचे असे झाले की मिशन आयएएस हा उपक्रम नागपूर विभागात राबविण्यासाठी मी नागपूरच्या विभागीय आयुक्त व आता प्रधान सचिव म्हणून पदोन्नत झालेल्या सौ विजयालक्ष्मी बिदरी यांची भेट घेतली आणि हा उपक्रम नागपूर विभागात राबविण्याची त्यांना विनंती केली. त्या म्हणाल्या हा उपक्रम आपण अगोदर नागपूर जिल्ह्यामध्ये राबवू आणि टप्प्याटप्प्याने इतर जिल्ह्यामध्ये त्याची सुरुवात करू .त्यांनी लगेच नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. सौम्या शर्मा यांना माझ्या अर्जावर लेखी सूचना दिल्या आणि त्यांना लगेच भेटावयास सांगितले .

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषद हे एकाच परिसरात आहेत. आम्ही विजयालक्ष्मी बिदरी यांच्याकडून सौम्या शर्मा मॅडम कडे गेलो . त्यांच्या दालनात शिरताच एक सुखद धक्का बसला.सर्वात महत्त्वाचे लक्ष वेधून घेतले ते प्रतिक्षालयामध्ये असलेल्या पुस्तकालयाने. प्रतिक्षालयात वेगवेगळी पुस्तके ठेवली होती. नागरिकांचा वेळ सदुपयोगी लागावा यासाठी त्याची योजना करण्यात आली होती. ते पाहून आनंद झाला. मी कर्मचाऱ्यांकरवी माझे व्हिजिटिंग कार्ड आतमध्ये पाठविले .लगेच मॅडमनी आम्हाला आतमध्ये बोलाविले. मिशन आयएएस हा उपक्रम नागपूर जिल्ह्यात राबविण्यासाठी त्यांनी लगेच शिक्षणाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आणि त्याची अंमलबजावणी पण सुरू झाली. नागपूर जिल्ह्यामध्ये आम्ही ठीक ठिकाणी स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेऊन हा उपक्रम यशस्वी करून दाखविला.

आता डॉ. सौ सौम्या शर्मा अमरावतीला आलेल्या आहेत. मध्यंतरी माझा अपघात झाला. ऑपरेशन झाले .त्यामुळे मॅडम अमरावतीला येऊन देखील मी त्यांना भेटू शकलो नाही. एक दिवस मॅडमच्या कार्यालयातून त्यांचे स्वीय सहायक श्री मेश्राम यांचा मला फोन आला . ते म्हणाले आयुक्त महोदयांना मिशन आयएएसबद्दल अजून जाणून घ्यायचे आहे. त्यांचे पीए श्री मेश्राम यांनी हा फोन केला होता.त्यांनी मला मॅडमला भेटावयास दीड वाजता येण्यास सांगितले. पण थोड्या वेळात परत त्यांचा फोन आला .मॅडमनी आपणास वेळ असेल तर ताबडतोब भेटावयास बोलविले आहे. मी लगेच अमरावती महानगरपालिका गाठली. तिथेही मला आचाराचा धक्का बसला. प्रतीक्षा आलयामध्ये छोटेखानी ग्रंथालय उभारण्यात आले होते.मॅडमला भेटलो .आम्ही दुसऱ्या वर्गापासून आय.ए.एस.चे प्रशिक्षण कसे देतोय याचे सविस्तर निवेदन सादर केले. तसेच दुसऱ्या वर्गापासून आयएएससाठी तयार केलेली पुस्तके त्यांना दाखविली. वरुडच्या ऑरेंज सिटी शाळेतील विद्यार्थी ज्युनिअर आयएएस परीक्षेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून गुणवत्ता यादीत आलेला आहे. त्या मुलाला देखील मी सोबत घेऊन गेलो होतो. मॅडमनी हा उपक्रम अमरावती शहरासाठी राबविणार असे आश्वासन दिले. मॅडमला एक तातडीची मिटींग होती .पण तरी देखील त्यांनी आम्हाला भरपूर वेळ दिला.

सौम्या शर्मा यांचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असे आहे की त्या लोकाभिमुख आयुक्त आहेत. त्या अमरावतीला आल्यापासून त्यांनी नुसतं कार्यालयात बसून न राहता अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या विविध



नगरात प्रत्यक्ष जाऊन तिथल्या अडीअडचणी समजून घेतल्या. मला याप्रसंगी सुप्रसिद्ध आयएएस अधिकारी श्री तुकाराम मुंढे यांची आठवण झाली. त्यांनी देखील नवी मुंबई महानगरपालिकेला आयुक्त असताना कॉफी विथ कमिश्नर असा उपक्रम आयोजित केला होता. ते एकेका भागात जायचे आणि लोकांना भेटायचे लोकांच्या समस्या समजून घ्यायचे. सौम्या शर्मा यांनी यापेक्षा वेगळा उपक्रम म्हणजे अमरावती महानगरपालिका परिसर गेल्या पाच सहा महिन्यात त्यांनी पिंजून काढला आहे. प्रत्येक भागात त्या गेल्या .पूर्वेकडे गेल्या. पश्चिमेकडे गेल्या .दक्षिणेकडे गेल्या व उत्तरेकडे गेल्या. तिथल्या नागरिकांना भेटल्या. आपल्या समस्या जाणून घेतल्या व त्यावर लगेच तोडगा देखील काढला.

अधिकारी आपल्या घरापर्यंत आला. अधिकारी आपल्या दारापर्यंत आला .ही कोणत्याही शहरातील नागरिकांना एक मोठी पर्वणी असते. त्यांचे काम होवो न हो आयुक्त आपल्याशी प्रत्यक्ष बोलत आहे आणि आपल्या समस्या समजून घेत आहे यामध्ये त्याला जे समाधान मिळते ते शब्दातीत असते . शब्दात व्यक्त करता येत नाही.ती किमया शर्मा मॅडम यांनी अमलात आणली आहे. आणि त्यात त्या शंभर टक्के यशस्वी झालेल्या आहेत .

तुम्हाला तुमची अमरावती महानगरपालिकेच्या संदर्भात कोणतीही समस्या असो ती तुम्ही व्हाट्सअप द्वारे अमरावती महानगरपालिकेला कळवा. त्यावर ताबडतोब उपाययोजना करण्याची तरतूद सौम्या शर्मा यांनी राबविली आहे आणि त्याला नागरिकांकडून व कर्मचाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मी मॅडमला सहज म्हणून एक तक्रार केली. एका ठिकाणी रस्त्यावर खूप सारी रेती पसरलेली होती आणि ती अपघाताला निमंत्रण देत होती. मॅडमला त्या रेतीचे छायाचित्र व लोकेशन पाठविले. मॅडमचा लगेच एसएमएस आला .आपला एसएमएस मिळाला .मी लगेच कारवाई करीत आहे. नुसतं उत्तर पाठवून त्या थांबल्या नाहीत .तर त्यांनी लगेच त्याच्यावर कार्यवाही करून ती रेती त्या ठिकाणाहून हटविली.

जितने वाले कोई अलग काम नही करते
वह हर काम अलग ढंग से करते है

या न्यायाने मॅडमनी आपले आगळेवेगळेपण दाखवून दिलेले आहे.

मॅडमचा मला सगळ्यात आवडलेला उपक्रम म्हणजे हॅपी स्ट्रीट म्हणजे आनंदी रस्ता. अमरावतीकरांच्या वैभवात भर टाकणारा हा एक अतिशय चांगला उपक्रम आहे. दर रविवारी चौकाचौकांमध्ये गाण्याचे नृत्याचे विविध प्रकारच्या कलांचे योगासनाचे सादरीकरणाचे कार्यक्रम त्या त्या भागातील नागरिकांना सादर करण्यासाठी मॅडमनी विचारपीठ उपलब्ध करून दिले आहे. प्रायोगिक तत्वावर त्यासाठी अमरावतीच्या मोर्शी रोडवरील वेलकम पॉईंटची निवड करण्यात आली. हा परिसर सुसज्ज आहे .तिथे नागरिकांनी यावे .हसत खेळत गावे . योगासने करावी. आपल्या ठिकाणी असलेली कला सादर करावी.या त्यांच्या उपक्रमाला नागरिकांनी सामाजिक संस्थांनी प्रचंड प्रतिसाद दिला. आज माणूस खूप ताण तणावात जीवन जगत आहे .या अशा प्रकारामुळे तो ताणतणावातून मुक्त होऊ शकतो एवढे मात्र खरे .

माझ्या 73 वर्षाच्या आयुष्यामध्ये मी अनेक आयुक्त पाहिले. त्यामध्ये सध्याच्या मनपा आयुक्त सौ सौम्या शर्मा यांचा क्रमांक वरचा आहे.कारण त्या केवळ खुर्चीवर न बसता लोकांमध्ये मिसळून लोकांचे प्रश्न समजून त्यावर कारवाई करतात . अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष श्री अब्राहम लिंकन यांनी ज्याप्रमाणे लोकशाहीची व्याख्या केलेली आहे त्याप्रमाणे लोकांची लोकांसाठी लोकांनी चालविलेली चळवळ ही त्यांनी प्रत्यक्षात अमलात आणली आहे.

मध्यंतरी त्यांनी स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या मुलांसाठी अमरावतीच्या भव्य अशा श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मध्ये स्पर्धा परीक्षा कार्यशाळा आयोजित करण्याचा उपक्रम राबविला .त्याला देखील अमरावतीकारांनी चांगला प्रतिसाद दिला.

आता महानगरपालिकेमध्ये महापौर उपमहापौर स्थायी समितीचे सदस्य नगरसेवक यांची निवड झाली आहे. सौम्या शर्मा यांनी राबविलेले उपक्रम त्यांना निश्चितच आवडतील व त्यांच्या या वाटचालीत या सर्व नगरसेवकांचे सहकार्य निश्चितच लाभेल या शंका नाही. सौम्या शर्मा यांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे**
संचालक , मिशन आयएएस अमरावती कॅम्प






# रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण हित लक्षात घेऊन भाजपा-मनसेची युती

## रेणापूर पंसचे नूतन सभापती,उपसभापती यांचे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर | प्रतिनिधी**

रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण विकासाचे हित लक्षात घेऊन पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती निवडीच्या अनुषंगाने भाजपा आणि मनसेची युती करण्यात आली असून नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत रेणापूर पंचायत समितीच्या एकूण आठ जागेपैकी भाजपाला तीन, मनसे दोन आणि काँग्रेसला तीन याप्रमाणे विजय प्राप्त झाला आहे. पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि मनसेचे नेते संतोष नागरगोजे यांच्यात चर्चा होवून रेणापूर तालुक्याच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांगीण हित लक्षात घेऊन युती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

भाजपा मनसेच्या युतीनुसार रेणापूर पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता मनसेच्या सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली तर उपसभापती पदाकरिता भाजपाचे शरद दरेकर यांना पाच मते आणि काँग्रेसचे बालाजी घोडके यांना तीन मते मिळाल्याने भाजपाचे शरद दरेकर उपसभापती पदासाठी विजयी घोषित करण्यात आले.

सदरील निवड जाहीर होताच आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मनसेचे नेते संतोष नागरगोजे, डॉ. नरसिंह भिकाने, शिवकुमार नागराळे, भागवत शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या विविध योजना निश्चितपणे खेचून आणू मात्र कोणाचीही आडवणूक होणार नाही याची काळजी घेऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे वैभव जपण्याचे काम पंचायत समितीच्या माध्यमातून व्हावे आपल्या कामाचा विभागातच नव्हे तर राज्यात वेगळा ठसा निर्माण करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. भ्रष्टाचार मुक्त आणि स्वच्छ प्रशासन देऊन लोकांच्या अडीअडचणी निश्चितपणे सोडवणूक करून रेणापूरची पंचायत समिती आदर्श निर्माण करू अशी ग्वाही मनसेचे संतोष नागरगोजे यांनी दिली. नेत्यांच्या विश्वासाला पात्र राहून काम करू कुठेही तडा जाणार नाही असे नवनिर्वाचित सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांनी बोलून दाखविले. प्रारंभी आ. कराड आणि नागरगोजे यांचे नुतन पदाधिकारी यांनी सत्कार करुन आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

यावेळी मनोज कराड, सुकेश भंडारे, विजय गंभीरे, बाळासाहेब मुंडे, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, वाहेद शेख, श्रीपाद बस्तापुरे, संतोष चव्हाण, राज जाधव, निवृत्ती लहाने, ओम चव्हाण, गोपाळ पडिले, धनंजय पवार, नवनाथ माने, महेश गाडे, लक्ष्मण खलंग्रे, अच्युत कातळे, लक्ष्मण यादव, विजय चव्हाण, साजिद पटेल, उत्तम चव्हाण, सुरेश बुड्डे, नंदकुमार वल्लमपल्ले, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, जयप्रकाश जटाळ, प्रमोद आंबेकर, रवी सूर्यवंशी, माणिक शिरसाट, प्रकाश गालफाडे, नरसिंग भताने, शिवराज शिरसाट, बलभीम जाधव, भैय्या गाडे, प्रकाश जाधव यांच्यासह दोन्ही पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गर्भलिंग तपासणी, मुलींचे संरक्षण व ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर आ.सुरेश धस यांची सभागृहात ठाम आवाज

**आष्टी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी राज्यात पुन्हा वाढू लागलेल्या गर्भलिंग तपासणीच्या प्रकारांबाबत गंभीर चिंता व्यक्त करत मुलींचे संरक्षण आणि ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर सभागृहात ठाम आवाज उठवला.

सभागृहात बोलताना आ.सुरेश धस यांनी सांगितले की, समाजात स्त्री-पुरुष समानतेची चर्चा होत असली तरी प्रत्यक्षात अजूनही मुलींबाबत भेदभाव दिसून येतो. काही वर्षांपूर्वी बीड जिल्हा मध्ये १००० मुलांमागे केवळ ६२८ मुलींचे प्रमाण इतके चिंताजनक झाले होते. विशेषतः शिरूर कासार येथे हे प्रमाण अत्यंत कमी होते. त्या काळात सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली; मात्र आजही राज्यातील काही भागात गर्भलिंग तपासणीचे प्रकार समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.

गर्भलिंग तपासणी रोखण्यासाठी असलेला Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act प्रभावीपणे राबवला जात आहे का, याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. हा कायदा अपुरा पडत असल्यास त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र सरकारकडे पाठवाव्यात,




अशी मागणीही त्यांनी केली. गर्भलिंग तपासणी करून मुलींचे गर्भपात करणाऱ्या डॉक्टर, एजंट आणि संबंधित टोळ्यांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली.

ग्रामीण भागात मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत असून काही ठिकाणी बाहेरच्या राज्यांतून मुली आणून फसवणुकीचे प्रकार होत असल्याची गंभीर बाबही आ.धस यांनी मांडली.

याचबरोबर ग्रामीण भागातील ऊसतोड महिला कामगारांची अत्यंत कठीण परिस्थितीही त्यांनी अधोरेखित केली. अपुऱ्या आरोग्य सुविधा, कमी हिमोग्लोबिन, प्रचंड श्रम आणि गर्भारपणातही काम करण्याची वेळ येते, ही वस्तुस्थिती सरकारच्या निदर्शनास आणून देत त्यांच्या आरोग्य तपासणी, सॅनिटरी नॅपकिन उपलब्धता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित कामाच्या परिस्थितीसंदर्भात ठोस निर्णय घेण्याची मागणी आ.धस यांनी केली.

समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करायची असेल तर मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि संपत्तीतील हक्क याबाबत ठोस पावले उचलली पाहिजेत. अनेक वेळा बहिणी स्वतःहून मालमत्तेतील हक्क सोडतात; परंतु महिलांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळाले तर समाजातील अनेक कुटुंबीय प्रश्न कमी होतील, असे मतही आ.धस यांनी व्यक्त केले.

मुलींचे संरक्षण, त्यांचे सन्मानाने जगणे आणि ग्रामीण महिलांचे प्रश्न सोडवणे ही केवळ शासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याची भूमिका शेवटी बोलताना आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी सभागृहात मांडली.

# मुस्लिम वसाहतीतील सामाजीक सभागृह व त्यालगतची खुली जागा मौलाना अबुल कलाम आझाद बहुउद्देशिय शिक्षण संस्था, महागांव यांना हस्तांतरण करा - परवेज सुरैया



**महागाव | प्रतिनिधी**

नगर पंचायत सर्व साधारण सभा दि. १४/०३/२०२२ ठराव क्र. ३२ नुसार नगर पंचायत कार्यक्षेत्रातील प्र.क. १६ मधील मुस्लीम वसाहतीतील सामाजीक सभागृह व त्यालगतची सर्व खुली (न.पं.) ओपनस्पेसची जागा मौलाना अबुल कलाम आझाद बहुउद्देशिय शिक्षण संस्था र.न. ७५४/२०१५ यांना देखरेख व सौदर्याकरण करणे तसेच वापराकरिता हस्तांतरीत करण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला होता.

सदर ठराव पारित होवून बराच कालावधी उलटून गेला आहे. परंतु अद्यापही सदर प्रकरणी कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. मुस्लीम समाजात नगर पंचायत प्रशासन व पदाधिकारी यांच्या विरोधात असंतोष निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांनी नगर पंचायत कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. तरी मुस्लीम वसाहतीतील सामाजीक सभागृह व त्यालगतची सर्व खुली (न.पं.) ओपनस्पेसची जागा मौलाना अबुल कलाम आझाद बहुउद्देशिय शिक्षण संस्था यांच्याकडे हस्तांरण करण्याची कार्यवाही करण्यासाठी वेग आणावा अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा नगरसेवक परवेज सुरैय्या यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदनातून मागणी केलेली आहे यावेळी सय्यद मौलाना, फिरोज पठाण,बशीर खा पठाण, शेख सद्दाम शेख अकबर,शेख मनान शेख नूर,शेख हैदर शेख समीर, अल्लाउद्दीन बागवान, शहबाज सुरैया, अहमद पठाण,अजित पठाण, हबीब पठाण, रहिमोदिन खतीब, टिपू सय्यद, यांच्यासह बऱ्याच मुस्लिम बांधवांच्या निवेदनांवर सह्या आहेत.

## परळीत घुमला शिवशंभूंचा जयघोष!

# छत्रपती संभाजी महाराज स्मारकास दुग्धाभिषेक

**परळी (प्रतिनिधी)**

परळी शहरात शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपतींच्या जयघोषाने वातावरण दणाणून गेले. छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकास दुग्धाभिषेक करून अभिवादन करण्याचा प्रेरणादायी उपक्रम छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आला.

यावेळी उपस्थित शिवभक्तांनी "शिवशंभूंचा जयघोष" करत परिसर अभिमानाच्या वातावरणाने भारावून टाकला. स्मारकास विधिवत दुग्धाभिषेक करून छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि पराक्रमाला अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना उपस्थित अण्णासाहेब जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमाची आठवण करून देत समाजामध्ये एकोपाक टिकला जावा. आणि या उपक्रमाची माहिती दिली



शौर्य प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत असून, इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा जागवणारा हा उपक्रम ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या प्रसंगी परळी शहरातील अनेक शिवभक्त, सामाजिक कार्यकर्ते आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी देवराव महाराज लुगडे, सेवकराम जाधव सर, बाळासाहेब कडबाने,शिवाजी देशमुख, नितीन भैया शिंदे,ॲड.अर्जुन सोळंके, यासह अनेकांची उपस्थिती होती.

# कराड हॉस्पिटल येथे मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी, मार्गदर्शन व उपचार शिबिर संपन्न

## स्त्री सन्माना सोबतच आरोग्य तपासणी शिबिरे महत्वाचे - पद्मश्री धर्माधिकारी

**परळी | प्रतिनिधी**

8 मार्च 2026 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त बीड जिल्हा स्त्रीरोग संघटना , परळी मेडिकल असोसिएशन, श्री बालाजी वैद्यकीय सामाजिक व शैक्षणिक संस्था संचलित कराड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी व उपचार शिबिर आयोजित केले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन परळी शहरच्या नगराध्यक्ष सौ पद्मश्री धर्माधिकारी यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून परळी न प च्या महिला बाल कल्याण सभापती सौ अंजली माळी, भाजपाच्या शहराध्यक्ष सौ उमाताई समशेटे तसेच नगरसेविका सौ अर्चना रोडे यांची उपस्थिती होती.

मोफत आरोग्य शिबिराची सुरुवात आरोग्याची देवता धन्वंतरी ,राष्ट्रमाता जिजाऊ तर मानवी श्रंखलेतून मुक्त करून शिक्षणाचे दरवाजे खुले करणाऱ्या श्रीमती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉक्टर शालिनी कराड यांनी केले तर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी पुढे बोलताना म्हणाल्या स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शक्ती असते त्यामुळे स्त्रीच्या सन्मानासोबतच आरोग्याची काळजी पण घेणे ही काळाची गरज आहे आणि आज ते कार्य महिला दिनानिमित्त परळी मेडिकल



असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर शालिनी कराड व त्यांच्या तज्ञ डॉक्टरांनी केले आहे त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देते व अशीच आरोग्य शिबिरे वेळोवेळी राबविण्यात यावे असेही त्या म्हणाल्या तर मंचावरील मान्यवर यांनीही आपले विचार व्यक्त केले

यावेळी शिबिरातील उपस्थित रुग्णांची रक्त तपासणी व विविध आजारावरील सर्व रुग्णांची तपासणी प्रसिद्ध फिजिशियन व कराड हॉस्पिटल चे संचालक बालासाहेब कराड यांनी केली.

या वेळी शिबिरात तब्बल 256 रुग्णांचे मोफत थायरॉईड हार्मोन्स तपासणी मार्गदर्शन व उपचार पार पडले.

तसेच हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कराड हॉस्पिटल चे संचालक व आमचे मार्गदर्शक बालासाहेब कराड व परळी मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉक्टर मनोज मुंडे,डॉ सुनीता झंवर तसेच डॉ गंगाराम डोंगरे , बीड जिल्हा स्त्रीरोग संघटनेचे सर्व स्त्री रोग तज्ञ, आणि कराड हॉस्पिटल चा पूर्ण स्टाफ यांचे अमूल्य सहकार्य मिळाले. शेवटी आभार प्रदर्शन परळी मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. मनोज मुंडे यांनी मानले